गोरा - जन - ५२४ - १८००(३)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

**२००९-२०१०**

क्रमांकः साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/४२ दिनांक २३.२.२०१०.

विषयः म.न.पा.कर्मचा-यांना दि. १.४.०५ पासून देय असलेल्या वेतनश्रेणी सुधारणेपोटी होलीकोत्सव २०१० पूर्वी आगाऊ रकमेचे अधिदान करण्याबाबत.

संदर्भः १. परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/२३ दि. २२.१०.०८.
२. परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/२९ दि. ३.३.०९.
३. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/३ दि. ३०.५.०९
४. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/११ दिनांक २९.७.०९
५. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/३० दिनांक २९.७.०९

......

महापालिका कर्मचाऱ्यांच्या दि.१.४.२००५ पासूनच्या वेतनश्रेणी सुधारणेसंदर्भात थकबाकीपोटी २० टक्के रकमेच्या पहिल्या हप्त्याचे अधिदान दिवाळी २००८ पूर्वी, तसेच २०टक्के रकमेच्या दुस-या हप्त्याचे अधिदान होळी २००९ पूर्वी, १५% रकमेच्या तिस-या हप्त्याचे अधिदान जून'०९ मध्ये व १५% रकमेच्या चौथ्या हप्त्याचे अधिदान ऑगस्ट'०९ मध्ये कर्मचा-यांच्या बँक खाती इ.सी.एस. (E.C.S.) द्वारे जमा करण्यात आली होती. पाचव्या हप्त्याची आगाऊ रक्कम देण्याबाबत दि. २०.२.२०१० रोजी संघटना प्रतिनिधींसमवेत व त्यानंतर मा. महापौरांसमवेत झालेल्या चर्चेदरम्यान म.न.पा. कर्मचाऱ्यांना थकबाकीपोटी खालीलप्रमाणे आगाऊ रक्कम देण्याचे मा. महापौरांनी जाहीर केले.

| ग्रेड वेतन | ठोक आगाऊ रक्कम (रु.) |
|---|---|
| रु. १३०० ते १८०० पेक्षा कमी | २०,००० |
| रु. १८०० आणि अधिक ते २८०० पेक्षा कमी | ३०,००० |
| रु. २८०० आणि अधिक ते ४२०० पेक्षा कमी | ५०,००० |
| रु. ४२०० आणि अधिक ते ६६०० पेक्षा कमी | ७५,००० |
| रु.६६०० आणि अधिक | १,००,००० |

याशिवाय खालील प्रवर्गांनाही ठोक आगाऊ रक्कम अनुज्ञेय करण्यात येत आहे.

१) म.न.पा. वेतनश्रेणीतील वैद्यकिय अधिकारी - रु.१,००,०००

२) वैद्यकिय महाविद्यालयातील यू.जी.सी. वेतनश्रेणीतील - रु.१,५०,००० अध्यापक वर्ग

३) म.न.पा. कर्मचाऱ्यांप्रमाणेच अंशकालीक कर्मचा-यांनाही खालील दराने ठोक थकबाकीचे अधिदान करावयाचे आहे.

| निश्चित वेतनाचे दर | आगाऊ रक्कम |
|---|---|
| रु. १४४१ ते २८८० | रु. ४०००/- |
| रु. २८८१ आणि वरील | रु. १०,०००/- |

रु. ६०० ते १४४० निश्चित वेतन मिळत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना जवळपास सर्वच रक्कम थकबाकीपोटी अगोदरच अदा केली असल्याने अशा कर्मचाऱ्यांना आता सदरचा हप्ता अनुज्ञेय होणार नाही. त्यांना थकबाकीची उर्वरित रक्कम अंतिम परिगणनानंतर देण्यात येईल.

इतर सूचना पुढील प्रमाणे आहेत :-

१. वरील तक्त्यातील दराने ठोक आगाऊ रकमा म.न.पा वेतनश्रेणीतील सर्व कर्मचारी, अधिकारी यांना तसेच सेकंडरी स्कूल कोड अंतर्गत म.न.पा. माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना खालील दराने अनुज्ञेय आहे.

| ग्रेड वेतन | आगाऊ रक्कम |
|---|---|
| रु.१६००/- पर्यंत | रु.१०,०००/- |
| रु.२८००/- पर्यंत | रु.१५,०००/- |
| रु.४२००/-आणि जास्त | रु.२०,०००/- |

२. माहे जानेवारी'२०१० च्या मासिक वेतनपत्रकात वेतन आकारण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना थकबाकीच्या पाचव्या हप्त्याचे अधिदान २०१० च्या होळीपूर्वी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यामध्ये ई.सी.एस.द्वारे जमा करण्यात येईल.

३. थकबाकीची पुरवणी वेतनपत्रके नेहमीच्या पध्दतीने संगणक विभागातून प्राप्त करुन संबंधित लेखा विभागात मंजूरीसाठी सादर करावीत.

४. थकबाकीच्या अधिदानाची रक्कम अंतिम थकबाकीच्या रकमेतून समायोजित करण्यात येईल.

५. सदर थकबाकीपोटी करावयाचा खर्च आर्थिक वर्ष २००९-१० मधील खालील अर्थसंकल्पीय शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

**अर्थसंकल्प अ,ब आणि ई अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी**

२१०५०१११०१ -- सुधारीत वेतनश्रेणीमुळे द्यावयाच्या थकबाकीच्या अधिदानासाठी ठोक तरतूद

**अर्थसंकल्प 'ग' अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी**

पर्यवेक्षीय कर्मचारी आणि दुय्यम

२१०१००१०३ -- सुधारीत वेतनश्रेणीमुळे द्यावयाच्या थकबाकीच्या अधिदानासाठी ठोक तरतूद

श्रमिक, तांत्रिक आणि इतर

२१०१००२०३ -- सुधारीत वेतनश्रेणीमुळे द्यावयाच्या थकबाकीच्या अधिदानासाठी ठोक तरतूद

६. उपरोक्त संदर्भित परिपत्रकातील इतर सर्व सूचना कायम आहेत.

७. महापालिकेच्या निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचारी / अधिकाऱ्यांना वर प्रस्ताविलेल्या ठोक आगाऊ रकमेच्या ५० % रक्कम देण्यात येईल.

८. सुधारीत वेतनश्रेणींची अंमलबजावणी प्रथमतः नोव्हेंबर २००८ पासून करण्यात आली असल्याने दि.१.११.२००८ रोजी वा नंतर सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना उपरोक्त आगाऊ रक्कम अनुज्ञेय नाही.

९. दि.१.४.२००५ ते ३१.१०.२००८ या कालावधीत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिच्छेद क्र.१ मधील तक्त्यात दर्शविलेल्या ठोक रकमेऐवजी त्यांच्या सेवा कालावधीनुसार आधार सामुग्री संस्करण विभागातर्फे यथाप्रमाण परिगणन करुन रक्कम अदा करण्यात येईल.

१०. सन २००९-२०१० या आर्थीक वर्षातील आयकर परिगणनासाठीचा फेब्रुवारी हा शेवटचा महिना असल्याने कर्मचारीनिहाय आयकर परिगणन पूर्ण झालेले आहे. यास्तव प्रस्तावित आगाऊ रकमेवर निम्न दर्शित दराने आधार सामग्री संस्करण विभागातर्फे आयकर वजावट करण्यात येईल.

| ग्रेड वेतन | आयकर वजावट |
|---|---|
| १) रु.१९००/-पर्यंत | १०.३० % |
| २) रु.१९००/-पेक्षा जास्त परंतू रु.४६००/-पर्यंत | २०.६० % |
| ३) रु.४६००/-पेक्षा जास्त आणि अधिक | ३०.९०% |

एखाद्या कर्मचा-याच्या बाबतीत प्राप्तीकराची वसुली कमी झाल्याचे आढळल्यास संबंधीत कर्मचाऱ्याने कमी वसुल झालेल्या आयकर रकमेचा भरणा आयुक्त, आयकर विभाग, अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या बँकेत दि.३१.३.२०१० पूर्वी स्वतः थेट करावा.

खाते प्रमुख, अधिष्ठाता, कक्षांतर्गत रुग्णालयाचे प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश सर्व संबंधित आस्थापना कर्मचाऱ्यांना द्यावेत.

सही/-२०.२.२०१०
उप प्रमुख लेखापाल
(आस्था.२)

सही/-२०.२.२०१०
प्रमुख लेखापाल
(पापुमनि)

सही/-२०.२.२०१०
प्रमुख लेखापाल
(वित्त)

सही/-२०.२.२०१०
उपायुक्त (सा.प्र.)

सही/-२०.२.२०१०
अति.आयुक्त (पूर्व उप.)

सही/-
अति.आयुक्त (प्रकल्प)

सही/-
महानगरपालिका आयुक्त

**परिपत्रक**

**२००९-२०१०**

क्रमांक: साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/४२ दिनांक २३.२.२०१०.

प्रत——————————————————यांना (—————जादा प्रतींसह)

माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

११/१/६१९२ २३/२/२०१०
**उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) यांजकरीता**



C.2010/Estt.II/February/Circular-5th Installment